<u>दरपत्रक सूचना</u>

जा.क्र.मरापप/भांडार/जेवण व नाष्टा/२०१८/95
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१
दिनांक :- ४/१/२०१८

प्रति,

____________________

____________________

____________________

**विषय :- 'जेवण व नाष्टा' पुरविणेसाठी संस्था निश्चित करणेबाबत (सन-२०१८-१९)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे सन २०१८-१९ या वर्षाकरिता परिषदेमध्ये परीक्षा विषयक वेगवेगळया बैठका, कार्यशाळा व प्रशिक्षण यांचे वारंवार आयोजन करण्यात येते. या कार्यशाळा एक ते सहा दिवसांच्या असतात. एका बैठकीसाठी साधारणपणे ४० ते ५० व्यक्ती सहभागी असतात शक्यतो एकावेळी एकच कार्यशाळा आयोजित केली जाते. परंतू काही वेळेस अपवादात्मक परिस्थितीमध्ये व प्रशासकिय कारणामुळे एकावेळी एकापेक्षा जास्त कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्यामध्ये व्यक्तीची संख्या १५० पर्यंत जात असतें. त्यासाठी संपूर्ण राज्यातून येणाऱ्या अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी जेवण पुरविण्याविषयी अंदाजे ५० ते १०० ताटे व नाष्टा यासाठी दर मागविण्यात येत आहेत. त्यासोबत वापरा व फेकून दया अशी ताटे व ग्लास पुरवावयाची असून स्वच्छ व शुध्द मिनरल वॉटर (ड्रममध्ये) पिण्याच्या पाण्याची सोयसुध्दा करावयाची आहे. सर्व बाबींकरीता मान्यता प्राप्त पुरवठाधारकाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. मागणीप्रमाणे पुरवठा करणेसाठी हे काम कराराच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीसाठी करु इच्छिणाऱ्या, तसेच पुढील अटी व शर्तीचा विचार करुन -

सदरचे दरपत्रक GST करांसहित सादर करावीत. GST क्रमांक देणे अनिवार्य आहे. GST क्रमांक नसल्यास आपला जमाखर्च रु.20 लाखापेक्षा कमी असल्याचे चार्टड अकौंन्टंट यांचे प्रमाणपत्र जोडावे.

**'जेवण व नाष्टा' पुरविणेसाठी** वार्षिक करार एक वर्षाच्या कालावधीकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकावर **'जेवण व नाष्टा'** असे स्पष्ट नमूद करुन सदर सीलबंद दरपत्रक, दि. ११.१.२०१८ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्विकारली जातील.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-411001

<u>सोबत :-</u> 'जेवण व नाष्टा' या विषयीचे दरपत्रक
(सन २०१८-१९)"प्रपत्र- अ" जोडले आहे.

E:\SUJATA\Darpatrak Babad -16-17\Lunch Breakfast Dar.Suchana-19417.doc

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७,डॉ.आंबेडकर मार्ग पुणे-४११००१

## 'जेवण व नाष्टा' या विषयीचे तांत्रिक दरपत्रक

## (सन २०१८-१९) "प्रपत्र- अ"

| अ.क्र. | तपशिल | प्रति व्यक्ती/ प्लेटचा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | **जेवण -**<br>तीन पोळ्या, दोन वाटया भाजी, (भाजीमध्ये वांगी किंवा बटाटा किंवा बटाटा वांगी एकत्र किंवा उसळ (मटकी किंवा मूग), फोडणीचे वरण (तेल, तिखट, मसाला, मीठ, व लसूण फोडणीसह), एक वाटी मुदभात, लोणचे (लिंबू किंवा आंबा) किंवा शेंगदाणा चटणी. | | |
| २. | **नाष्टा प्लेट -**<br>१) पोहे<br>२) शिरा<br>३) उपमा<br>४) उडीद वडा सांबार<br>५) इडली सांबार<br>६) बटाटे वडे (चपटे लहान) दोन<br>७) बटाटे वडा पाव (एक पाव एक वडा चपटा लहान)<br>८) कांदा भजी<br>९) बटाटा भजी | | |
| ३. | **स्विट डिश**<br>१) गुलाबजाम- २ नग<br>२) काजू कतली-२ नग<br>३) श्रीखंड १ वाटी<br>४) बर्फी (मावा) - २ नग<br>५) जिलेबी-४ नग | | |
| ४. | १) चहा<br>२) कॉपी<br>३) बिसलेरी वॉटर-५०० मिली<br>४) बिसलेरी वॉटर-१०० मिली | | |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-411001

E:\SUJATA\Darpatrak Babad -16-17\Lunch Breakfast Dar.Suchana-19417.doc